

# जय वाराणसी एक्सप्रेस

**पद्मभूषण प्रो. जयंत नारळीकर**

''सर! तुम्ही 'ती' गाडी का निवडलीत? अजूनही शक्य असेल तर त्याऐवजी बाँबे मेलने जा.'' माझे स्नेही रामसूचित पांडे मला आवर्जून सांगत होते.

एरव्ही शांत, संथ स्वभावाच्या ह्या व्यक्तीकडून अशी आग्रही भाषा ऐकून मी चकित झालो. मी वैज्ञानिक असल्याने वैज्ञानिक दृष्टिकोण वापरूनच वाराणसी एक्स्प्रेसने मुंबईला जाण्याचा निर्णय घेतला होता. माझा युक्तिवाद साधा सरळ आणि बिनचूक होता. (निदान असे मला वाटले.) ही ट्रेन बनारस (वाराणसी) हून सुरू होऊन थेट मुंबईला जात होती. निघण्याची वेळ सकाळी ११ वाजता सोयीची होती. शिवाय माझ्याकडे आरक्षण होते. 'यो ध्रुवाणि परित्यज्य...' श्लोकानुसार ते हातातले आरक्षण टाकून आयत्यावेळी वेगळ्या गाडीकडे धाव घेण्यात अर्थ नव्हता. त्यातून बाँबे मेल कलकत्याहून सुटून बिहारमधून येणार, तिचा काय भरवसा? आणि ती मोघलसराई स्थानकातून सकाळी आठला पसार होणार, तिच्यासाठी भल्या पहाटे उठण्याची कटकट कोणाला हवी? मी पांडेजींना ही कारणे सांगून माझा विचार पक्का असल्याचे स्पष्ट केले.



''पण साहेब तुम्हाला माहीत आहे, बनारस अलाहाबाद दरम्यान सिंगल ट्रॅक आहे. गाडी हळू जाते.'' पांडेजींनी आणखी एक मुद्दा काढला.

पण त्यावर माझ्याकडे उत्तर तयार होते. ''पांडेजी, मी लहानपणी एम.एस.एम. (मद्रास अँड सदर्न मराठा) रेल्वेने पुणे-कोल्हापूर प्रवास केला आहे ते तुम्ही विसरता! धिम्या गाड्यांबद्दल मला सांगू नका.''

''पण तुम्ही जाणार तो प्रजासत्ताक दिन आहे...'' पांडे म्हणाले. त्यांना आणखी काही सांगायचे होते, मात्र काही विद्यार्थी तेवढ्यात मला भेटायला आल्याने ते ह्या वाक्याचा खुलासा करू शकले नाहीत.

हा व्यत्यय आला नसता तर बरे झाले असते असे मला आता पश्चातबुद्धीने वाटते. कारण पांडेजींचा खुलासा महत्वाचा होता.

आम्ही एक डझन वैज्ञानिक बनारस हिंदू युनिव्हर्सिटीत अंतराळ शास्त्रावरील परिसंवादासाठी मुंबईहून आलो होतो. परतीचे आरक्षण आम्हा सर्वांनी वाराणसी एक्स्प्रेस वर केले होते. निघण्याचा दिवस होता २६ जानेवारी, प्रजासत्ताक दिन. वाराणसी कँटोन्मेंट स्थानकावर यथासमय हजर झालो.

आम्ही आमच्या आरक्षित जागी बसलो आणि गाडी वेळेवर सुटली. योग्य वेळी सुरुवात म्हणजे निम्मे काम फत्ते असे म्हणत मी वाचनासाठी बरोबर घेतलेले पुस्तक उघडले. उगाच पांडेजी काळजी करत होते....

ट्रेन संथपणे निघाली, दहा मिनिटे चालली आणि थांबली. सिग्नल? नाही. सिग्नलने आडवले नव्हते. पण रुळांच्या आजूबाजूला बरेच लोक उभे होते. ॲक्सिडेंट? तसेही नव्हते; कारण लोक खुशीत होते. उत्सवी मूडमध्ये होते. ते सगळे ट्रेनमध्ये चढले आणि पंधरा मिनिटांत गाडी पुन्हा सुरु झाली.

आणि अर्धा किलोमीटर जाऊन थांबली! आणखी गर्दी गाडीत चढली. काही मुले खिडक्यांवर चढली. ही काय हुडिनीप्रमाणे बार असलेल्या खिडक्यांतून आत घुसणार? नाही. आत घुसायचे नव्हते. आमच्या डब्याच्या छपरावर धक्के बसले त्यावरून कळले... त्यांना गाडीच्या टपावरून प्रवास करायचा होता.

अशातऱ्हेने थांब-जा-थांब करत आमची गाडी दीड तासात पंचवीस तीस किलोमीटरवरील स्थानकावर पोचली. तिथे बाहेरून काही स्वयंस्फूर्त नेत्यांनी टपावरच्या लोकांना खाली उतरण्याचे आवाहन केले. थोडी बाचाबाची झाल्यावर टपवाले खाली उतरले आणि त्यांनी गाडीतल्या कॉरिडॉर्स व्यापून टाकल्या. आमचा डबा फर्स्टक्लासचा असल्याने ते आत घुसले नाहीत. कदाचित् हा यू.पी. आणि बिहार मधला फरक असावा.

अनेक तज्ज्ञांच्या नेतृत्वाखाली एखाद्या देशाची वाटचाल जा-थांबा-जा हळू-वेगाने इत्यादी प्रकाराने होते तशी आमची गाडी भदोहीला पोहोचली. तोपर्यंत दीड तास लेट झाली होती. दुपारचे तीन वाजले होते.

''आपण किती अंतर गेलो?'' एका सहप्रवाशाने विचारले. एका विजेच्या तारांच्या खांबाने अंतर पुरवले. आम्ही साठ किलोमीटर पुरे केले होते.... एकूण अंतराच्या चाळीस टक्के. वेळापत्रकाप्रमाणे

Fast & Ready and not slow & steady will win the race.

गाडी दुपारी सव्वाचारला अलाहाबादला पोचायची होती.

भदेहीच्या फलाटावर मात्र आमच्या गाडीने दीर्घ विराम घेतला. आम्ही वाट पाहात होतो तोपर्यंत दोन-तीन एक्स्प्रेस गाड्या आम्हाला मागे टाकून पुढे पसार झाल्या. आमच्या गाडीला, तिचे नाव एक्स्प्रेस असले तरी अलाहाबादपर्यंत पॅसेंजरचा दर्जा होता. त्यातून मुळातच लेट झाल्याने एकमार्गी रुळावरचा तिचा हक्क तिने केव्हाच गमावला होता. अशा परिस्थितीत एक तास मुक्काम केल्यावर आम्हाला आणखी एक तथ्य समजले.

आमच्या गाडीचे इंजिनच गायब झाले होते.

आणि त्या पाठोपाठ अटकळींना (नेहमीप्रमाणे) उधाण आले. इंजिन बिघडले आहे, नाही ते शंटिंगसाठी वापरत आहेत, छे! छे! एका व्ही. व्ही. आय. पी. करता खास गाडी सोडली त्यासाठी ते गेले, नाही हो, ड्रायव्हर जेवण करायला ते घरी घेऊन गेला आहे... आणि प्रत्येक अटकळ ठाम सत्याच्या विश्वासाने सांगितली जात होती.

पण त्यांना ब्रेक लावण्यासाठीच जणू ते (हरवलेले) इंजिन परत येताना दिसले. चांगले धडधाकट होते की. आणि बिचारे साठ किलोमीटरचा मोठा पल्ला पुरा करून आले तर पाणी तरी नको का? ड्रायव्हर लंचब्रेकला गेला तसे ते पाणी पिऊन आले.

भदोहीत अडीच तास मुक्काम ठोकून आमची गाडी पुढे सरकली. दरम्यान आमचे बिन तिकिटाचे बरेचसे प्रवासी आमच्या गाडीचा आश्रय सोडून पुढे गेलेल्या एक्स्प्रेस गाडयांच्या टपावरून पुढे गेले होते. हे मुक्त पंछी आरक्षणामुळे आमच्या गाडीला बांधलेले थोडेच होते?

पण आता ही गाडी सुटते म्हटल्यावर दुसरे मुक्त पंछी त्यांच्या जागी घुसले.

आमच्या डब्यात चर्चा सुरू झाली. ही वाराणसी 'एक्स्प्रेस' अशा सापत्नभावाने का वागवली जाते? इतर गाड्या पुढे गेल्या, आम्ही मात्र रखडत आहोत.

कारण ह्या गाडीवर मुंबईला जाणारे प्रवासी असतात. मुंबईच्या धकाधकीच्या जीवनात क्षण अन् क्षण हिशोबात धरतात. त्या मुंबईकरांना कालविरहीत जीवनचर्येची माहिती द्यायला ह्या गाडीची योजना उत्तर रेल्वेने केली असावी.

पण आमच्या ह्या अटकळवजा चर्चेत भाग न घेता एक सहप्रवासी मात्र शांतपणे एक पुस्तक वाचीत होता. ती कादंबरी होती रशियन क्रांतीनंतरच्या काळातील. जेव्हा आगगाड्या वेळापत्रकाशिवाय धावत होत्या आणि कुठून कुठे केव्हा पोचतील याची शाश्वती नसाची. डबे तसेच डब्यांचे टप तिकिटाशिवाय प्रवास करणाऱ्यांनी भरलेले असत. वाराणसी एस्क्प्रेसवर प्रवास करतांना वाचायला अती योग्य पुस्तक!

माझ्या शरीरधर्माने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देण्यासाठी डब्याबाहेर जाण्याकरता दार उघडले तर कॉरिडॉर ठसाठसा भरलेला. त्यातून मार्ग काढीत जाणे म्हणजे इच्छाशक्ती आणि शारीरिक शक्ती दोन्हींना 'सुपर ह्युमन' स्तर गाठण्याचे ते आव्हानच होते.

आता अंधार पडला होता, पण डब्यातले दिवे काम करत नव्हते. मात्र पंखे चालत होते हे नशीब. वाचणे अशक्य झाल्यामुळे हळुहळू झोपेचा पगडा बसला. मला एक स्वप्न पडले. स्वप्नात मला एका कोर्टात आरोपी म्हणून उभे केले होते. सतत साखळी खेचून गाडी थांबवणाऱ्या, तिकिटाशिवाय प्रवास करणाऱ्या गाडीतले कॉरिडॉर, टप सर्व आडवणाऱ्या जमावाला मी रागावलो होतो आणि त्यांना त्यांच्या सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव करून द्यायचा प्रयत्न केला हा माझा गुन्हा. न्यायाधीश महाशय गंभीर चेहऱ्याने आपला निकाल सांगू लागले, ''प्रजासत्ताक दिनी ह्याच काय देशातल्या सर्व रेल मार्गांवर फुकट प्रवास करण्याचा लोकांचा हक्क सतत अबाधित राहिला आहे हे आरोपीला माहीत असायला हवे. स्वत:चे मूलभूत हक्क बजावण्यात अडथळा करणाऱ्या व्यक्तीला कायद्यानुसार लागू असलेली सर्वात कडक शिक्षाही सौम्यच ठरते.'' असे म्हणून त्यांनी समोरच्या काळ्या विगवर दृष्टिक्षेप टाकला. मी आठवण्याचा प्रयत्न करू लागलो- देशात फाशीची शिक्षा अजून आहे का? पण जज्ज साहेबांच्या मनात काहीतरी वेगळा पर्याय असावा कारण एक दुष्ट समाधान त्यांच्या चेहऱ्यावर झळकले. ते म्हणाले, ''पुढली दहा वर्षे प्रत्येक प्रवासी प्रजासत्ताकदिनी आरोपीने ह्या गाडीने प्रवास केला पाहिजे अशी शिक्षा मी फर्मावितो.''

''नको! नको! मला मृत्युदंड द्या.'' असे मी स्वप्नात ओरडल्याचे आठवते. पण इथे मला जाग आली. तेव्हा गाडी उसाच्या शेतात उभी होती. कारण साखळी ओढून तिला थांबवले होते. कारण तिच्यातल्या व्ही.आ.पी. यात्रेकरूंना ऊस हवे होते. पुरेसे ऊस उपटून झाल्यावर ते परत ट्रेनवर चढले आणि तिला हिरवे निशाण दाखवले.

पण मी आता ते दृश्य तटस्थ भावनेने पाहत होतो. प्रजासत्ताक दिनी जनतेला मिळालेला- नाही जनतेने घेतलेला- तो आणखी एक मूलभूत हक्क होता.

आमच्या डब्यातला एक मुंबईकर सहज बोलून गेला, ''ह्या मार्गावर पुष्कळ माकडे दिसतात असे ऐकले होते. ती दिसली नाहीत.'' मी उत्तरलो, ''ही काय, आपल्या ट्रेनवर चढलीत...'' पण मग मला वाटले की मी माकडांचा अपमान करत नव्हतो का?

वाराणसी एक्स्प्रेस अलाहाबादला पोहोचली तेव्हा रात्रीचे ११ वाजून गेले होते.

Turn your melodrama into a mellow Drama.